नि. फौ. ख. क्र. १६०००५५/२०१४
सरकार वि. विजय व इतर.
निशाणी– ११४.

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची जबानी.**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव** — अनिल नागेश धर्माधिकारी,
**वय**– ७२ वर्ष– धंदा– वकिली व शेती.
**राहणार** — मानस भवण चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक.

.................................................................................................

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

१. दिनांक ०७/०८/२०१३ रोजी मी व माझा भाउ उमाकांत धर्माधिकारी दुपारी ०३.३० वाजताच्या सुमारास न्यायालयात कामकाज करीत होतो. त्यावेळी मला डॉ. मोदी यांचे वॉचमनचा फोन आला की आपल्या खाजगी प्लॉटमध्ये विजय गणपत कोतवाल, नाना शिंदे व इतर चार–पाच जण होते. त्यांची नावे मला वयोमानाने आठवत नाही. माझा खाजगी प्लॉट गणूर रस्त्यावर प्लॉट क्रं. ५७१/१/५/६ आहे. त्यावेळी मला फोनवरुन आरोपींनी एक जेसीबी व २–३ ट्रॅक्टरच्या सहयाने गौण खणिजाचे उत्खनण केले होते असे कळाले. त्यानंतर मी, माझा भाउ माझ्या प्लॉटवर गेलो त्यावेळी डॉ. मोदी त्याठिकाणी हजर होते. मी त्यावेळी आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, शासनाच्या परवानगीशिवाय किंवा आमच्या परवानगी शिवाय उत्खनन करता येत नसल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपींनी गावाच्या विकासाच्या आड कोणी यायचे नाही अश्या धमक्या दिल्या. त्यावेळी त्यांनी आम्हांला तुमचे मुडदे पाडू दहावे व बारावे करु अश्या धमक्या दिल्या. त्यावेळी साक्षीदार आले व त्यांनी सोडवासोडव केली व पुढील अनर्थ टळला. शांतता भंग होण्याची शक्यता टळली. त्यानंतर आम्ही कोर्टात निघूण आलो. त्यानंतर मी व माझ्या भावाने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्यानंतर तहसलीदारांकडे तक्रारी अर्ज दिला होता. ट्रक्टर व जेसीबीचा क्रमांक मला

वयोमानाने सांगता येणार नाही. गट क्रं. ५७१/१ आमची वारसाहक्काने मिळकत होती. गट क्रं. ५७१/५ व ५७१/६ हा राजेंद्र डुंगरवाल व अनिल शांतिलाल मोदी यांचा होता. आरोपींनी वरील तिन्ही प्लॉटमध्ये गौण खनिजांचे उत्खनन केले होते.आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकत नाही. आज विजय गणपत कोतवाल न्यायालयात हजर आहे इतर आरोपींना त्यावेळी जमाव असल्याने कोण कुठे होते हे माहित नसल्याने ओळखत नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. पी. एस. कोतवाल वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

२. त्यावेळी २५ ते ३० लोकांचा जमाव होता. माझे विजय गणपत कोतवाल व इतर लोकांसोबत बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील आरोपींची पूर्ण नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना नावानिशी ओळखू शकत नाही. साक्षीदार सांगतो की, पाच आरोपी सोडून मी बाकी इतर लोकांना ओळखू शकत नाही. मी त्या पाच आरोपींचे पूर्ण नावे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पाच आरोपींना नावानिशी मी ओळखू शकत नाही. साक्षीदार सांगतो की, त्याला जेवढे ओळखू येतील तेवढयांची नावे सांगता येतील.

३. माझे शिक्षण बी.ए.एल.एल. बी. पर्यंत झाले आहे. मी सण १९८६ मध्ये सणद घेतली व वकिली व्यवसाय करीत होतो. मी सण २०२० पर्यंत ३० ते ३२ वर्ष वकिली व्यवसाय केला. मी वकिली व्यवसाय करतांना दिवाणी, फौजदारी व इतर प्रकरणे चालवली आहे. माझे भाउ उमाकांत हे वकिल होते. त्यांनी ५० वर्ष वकिली व्यवसाय केला आहे, ते ५–६ वर्षापूर्वी मरण पावले.

४. न्यायालयापासून प्लॉटचे अंतर दिड ते पावने दोन कि. मी. आहे. वॉचमनचे नाव मला सांगता येणार नाही. वॉचमनच्या ज्या क्रमांकावरुन फोन आला

होता तो क्रमांक मला सांगता येणार नाही. दखलपात्र गुन्हयाची तक्रार नोंदवून घेणे पोलिसांना आवश्यक असते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी तक्रार न घेतल्यास त्याबाबत वरिष्ठांकडे व न्यायालयात तक्रार दाखल करता येते. हे म्हणणे खरे आहे की, नुकसान भरपाई मिळण्याकरीता न्यायालयात दावा दाखल करता येवू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात खाजगी तक्रार व नुकसान भरपाई करीता दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणतेही नुकसान केले नव्हते म्हणून मी खाजगी तक्रार व नुकसान भरपाईकरीता दावा दाखल केला नाही.

५. मी पोलिसांना जवाब देतेवेळी, "त्यावेळी मला डॉ. मोदी यांचे वॉचमनचा फोन आला की आपल्या खाजगी प्लॉटमध्ये विजय गणपत कोतवाल, नाना शिंदे व इतर चार–पाच जण होते, त्यांची नावे मला वयोमानाने आठवत नाही, माझा खाजगी प्लॉट गणूर रस्त्यावर प्लॉट क्रं. ५७१/१/५/६ आहे, त्यावेळी मला फोनवरुन आरोपींनी एक जेसीबी व २–३ ट्रॅक्टरच्या सहयाने गौण खणिजाचे उत्खनण केले होते असे कळाले'' तसेच, "मी त्यावेळी आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, शासनाच्या परवानगीशिवाय किंवा आमच्या परवानगी शिवाय उत्खनन करता येत नसल्याचे सांगितले, त्यावेळी आरोपींनी गावाच्या विकासाच्या आड कोणी यायचे नाही अश्या धमक्या दिल्या'' तसेच "मी व माझ्या भावाने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली''या बाबी सांगितल्या होत्या. वरील बाबी माझ्या बयानात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी जवाब नोंदवून घेतला त्याबाबत माझ्याकडे विचारणा केली नव्हती.

६. मी जे गट क्रं. घेतले होते त्या मिळकती मी एन. ए. केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट क्रं. ५७१/१/५/६ या क्रमांकाचा प्लॉट अस्तीत्वातच नाही. पोलिसांनी माझ्याकडे प्लॉट क्रं. ५७१/१/५/६ चा सातबारा उतारा मागितला नाही व मी दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्लॉट क्रं.

५७१/१/५/६ अस्तीत्वात नसल्याने पोलिसांनी सातबारा उतारा मागितला नाही व मी त्यांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं. ५७१/१/५/६ हा मी, अनिल मोदी, राजेंद्र डुंगरवाल व मयत भाउ उमाकांत यांच्या मालकीचा होता. हे मला माहित नाही की, त्या मिळकती शेजारी गावातील सांडेपाणी वाहून जाणारे गावतळे आहे किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, गावातील सर्व सांडपाणी त्या ठिकाणी येत असल्याने दुर्गंधी येत होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व गावतळयाला लागून सुनिल आबड यांची जमीन आहे. हे मला सांगता येणार नाही की, सुनिल आबड याने सदर सांडपाणी जाणा–या रस्त्यावर भर टाकल्याने सदरचे सांडपाणी माझे मिळकतीत येत होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या मिळकतीचे बाजार मुल्य कमी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी आम्ही सदरचे सांडपाणी गावतळयात येण्यापासून बंद करण्याचे प्रयत्न करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सण २०१३ मध्ये विजय कोतवाल चांदवड गावाचे सरपंच होते. हे म्हणणे खरे आहे की, इतर आरोपी हे आरोपी क्रं. १ विजय कोतवाल यांचे जवळचे नातेवाईक व मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी गावतळयात येणारे पाणी बंद करण्याचा प्रयत्न करीत होतो त्याला आरोपी क्रं. १ सरपंच या नात्याने विरोध करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्रं.१ मला विरोध करीत होता म्हणून मी त्यांच्या विरुध्द खोटया तक्रारी दिल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीनाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.07.18 15:35:51 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड.**

दि. १८/०७/२०२५.

नि. फौ. ख. क्र. १६०००५५/२०१४
सरकार वि. विजय व इतर.
निशाणी– ११५.

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

**<u>माझे नाव</u>** – समिर अख्तर शेख,
**<u>वय</u>**– ५२ वर्ष– धंदा– फोटोग्राफर.
**<u>राहणार</u>** – चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक.

......................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. दिनांक ०९/१०/२०१३ रोजी माझे फोटोग्राफ दुकानात हजर होतो. त्यावेळी पोलिस स्टेशनमधून फोटो काढण्यासाठी पोलिस कर्मचारी आले होते. मला बरेच दिवस झाले असल्याने त्यांचे नाव सांगता येणार नाही. मी त्यांच्यासोबत ढावकर नगर पुढे गणूर रस्त्यावर गेलो होतो. मी त्या ठिकाणी जागेचे फोटो काढले होते. मी सदरचे फोटो पोलिसांना दिले होते. त्या ठिकाणी काही ठिकाणी पाणी व काही ठिकाणी जमीन दिसत होती. तेथे आणखी काय केले होते हे मला दिसले नाही. मला मी काढलेले फोटो दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला फोटो दाखविले. साक्षीदाराने ते ११ फोटो ओळखले. ते मीच काढले होते. त्या ११ फोटोंना एकत्रीत **वस्तु–अ** देण्यात आला.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. पी. एस. कोतवाल वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

२. मी मागील ३० वर्षापासून फोटोग्राफीचा व्यवसाय करतो व माझे फोटो शॉप आहे. मी सदर दुकानाबाबत ग्रामपंचायतेकडून व शॉप अक्ट खाली परवानगी घेतलेली नाही. मी फोटोग्राफीचे अधिकृत प्रशिक्षण घेतलेले नाही. मी फोटो मेमोरी कार्ड असणा–या कॅमे–यातून काढलेले आहे. मी स्वतःच फोटो डेव्हलप करीत होतो. मला हॅश व्हल्यू म्हणजे काय आहे हे माहिती नाही व मी फोटोंची हॅश व्हल्यू

तपासलेली नव्हती. मी तिस वर्षात कोणकोणते फोटो काढले त्या सर्वांचे विवरण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी काढलेल्या फोटोवर व डेव्हलप केलेल्या फोटोवर माझी सही व ओळखीची खुण नसते. वस्तु– अ वरील फोटोवर माझी सही व ओळखीची खुण नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी वकिलांनी मला फोटो काढल्याचे सांगितले व त्यावरुन मी ते स्वतः काढल्याचे आज न्यायालयात सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांना मी कोणतेही बिल दिले नव्हते व त्यांनी माझ्याकडे मागितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फोटोचे बिल नसल्याने मी त्या दिवशी कोणते फोटो, किती फोटो व कोणत्या आकाराचे फोटो काढले हे मला सांगता येणार नाही. मी मुळचा चांदवड येथीलच रहिवासी आहे. चांदवड गावात शेकडो तळे पूर्वीपासून अस्तीत्वात आहेत. कोणते तळे कोणत्या मिळकतीत आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी पोलिस माझ्याकडे आले व त्यांनी तळयाचे फोटो काढायचे म्हणून मला सांगितले व मी त्यानंतर जाउन तळयाचे फोटो काढले. हे म्हणणे खरे आहे की, फोटो कोणत्या मिळकतीत असलेल्या तळयाचे काढले होते हे मला नेमके सांगता येणार नाही.

३. मी पोलिसांना जवाब देतेवेळी, "मी त्यांच्यासोबत ढावकर नगर पुढे गणूर रस्त्यावर गेलो होतो'' ही बाब सांगितली नव्हती. मी सदर बाब आज पहिल्यांदा न्यायालयात सांगितली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नव्हतो व कोणतेही फोटो काढले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वस्तु–अ वरील फोटो घटनास्थळाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीनाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.07.18 15:35:59 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**

**दि. १८/०७/२०२५.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चांदवड.**